नि.के.नं.१२३/२०२२
नि. क्र. ४४

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**
**माझे नाव** – स्नेहलता नरसिंग शिंदे
**वय वर्षे** –६०, **व्यवसाय** – गृहिणी
**राहणार** – नांदीवसे, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी.
**मी सत्य प्रतिज्ञेवर असे कथन करते की,**

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीम.एस.आर.वनकर यांचेमार्फत सुरु.**

आरोपी क्र.३ दिर व क्र.१ आणि २ पुतणे आहेत. त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकते. आज रोजी हजर आहेत. दि.१५.०६.२०२२ रोजी सायं. ०५.०० ते ०६.०० वा. सुमारास घरच्या कुळस्वामीनीला नारळ का दिला नाही या वरुन किरकोळ बोलाचाली झाली. त्यामुळे आम्ही एकमेकांविरूध्द तक्रारी दाखल केल्या. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५.०६.२०२२ रोजी संध्या. ०५.०० वा. सुमारास आरोपी माझ्या घरी आले व माझा मुलगा प्रसाद यास जास्त शहाणा झालास का, राखन देताना कुलस्वामींना नारळ देण्याचे तु कोण सांगणार असे म्हणून माझा मुलगा प्रसाद यास कॉलर धरून बाहेर खचले व लाथा बुक्यांने मारहाण केली, रस्त्याने फरफटत नेवून त्याची गळपट्टी धरून त्याचे डोके रस्त्यावर आपटले.

**साक्षीदार अभियोग पक्षाला सहाय्य करत नसलेने सरकारी वकील यांचे तोंडी विनंतीवरुन त्यांना भारतीय पुरावा कायदा कलम १४५ व १५४ अन्वये उलट तपासादरम्यान विचारण्यात येणारे प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली व ती दिली.**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१५.०६.२०२२ रोजी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब नोंदवला. आता मला दि.१५.०६.२०२२ रोजीचा जबाब दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. आता मला अधोरेखांकित भाग अ वाचून दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकूर मी पोलीसांना सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझे व आरेपींचे आपसात तडजोडीने वाद मिटले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला

प्रस्तुतची केस पुढे चालविण्याची नाही. साक्षीदाराने सही ओळखल्याने सहीला **नि.४५** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण**.

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस.सी.नार्वेकर यांनी नाकारला.</u>**

**उलटतपास पुर्ण**.
**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृती.
सही/-
(वाय.सी. पाटील )

दिनांक - २०/०२/२०२६
चिपळूण.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, व
न्यायादंडाधिकारी वर्ग-१,चिपळूण.

## <u>- प्रमाणपत्र -</u>

मी हमी देतो की, सदरच्या पी. डी. एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ पुराव्यामधील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | एम.इ.आरेकर, लघुलेखक श्रेणी–३ |
| **न्यायालयाचे नाव** | **सह दिवाणी न्यायालय क.स्तर, चिपळूण, ता.चिपळूण जि.रत्नागिरी.** |
| पुरावा टंकलेखीत दिनांक | २०.०२.२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | २०.०२.२०२६ |
| पुरावा अपलोड केलेले दिनांक | २१.०२.२०२६ |